**चाकण परिसरातील रस्ते दुरुस्ती, वाहतूक कोंडी निवारण व वाहतूक व्यवस्थापनासाठी उच्चस्तरीय समिती तसेच उद्योग तक्रार निवारण कक्ष गठीत करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**नियोजन विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक: नीतिआ-२०२३/प्र.क्र.२६/का.१४१२**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक : १४ ऑगस्ट, २०२६.

**प्रस्तावना:-**

चाकण व लगतच्या औद्योगिक क्षेत्रामध्ये औद्योगिक व व्यावसायिक आस्थापनांची वाढती संख्या, जड वाहनांची मोठ्या प्रमाणावरील वाहतूक, वाढती लोकसंख्या तसेच भविष्यातील औद्योगिक विस्ताराच्या अनुषंगाने रस्ते व वाहतूक पायाभूत सुविधांवर मोठ्या प्रमाणात ताण निर्माण झाला आहे. रस्त्यांची खराब अवस्था, अपुरी वाहतूक क्षमता, विविध ठिकाणी निर्माण होणारी वाहतूक कोंडी व विविध शासकीय विभाग/प्राधिकरणांच्या अखत्यारीतील रस्त्यांमध्ये आवश्यक समन्वयाचा अभाव यामुळे वाहतूक व्यवस्थेवर परिणाम होत आहे.

चाकण परिसरातील रस्ते सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, स्थानिक स्वराज्य संस्था, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, पुणे महानगर क्षेत्र विकास प्राधिकरण व इतर संबंधित विभाग/प्राधिकरणांच्या अखत्यारित आहेत. तथापि, संपूर्ण परिसरातील रस्ते व वाहतूक व्यवस्था ही परस्परांशी निगडित असल्याने तिचे विभागनिहाय नियोजन न करता एकात्मिक पध्दतीने नियोजन व कार्यवाही करणे आवश्यक आहे. तसेच चाकणसह पुणे जिल्ह्यात नवीन उद्योग व Global Capability Centres (GCCs) मोठ्या प्रमाणावर येत असून विविध शासकीय विभागांकडून आवश्यक मंजुरी व परवानग्या मिळविताना काही प्रकरणे प्रलंबित राहत आहेत.

वरील बाबींचा विचार करुन चाकण परिसरातील रस्ते दुरुस्ती, वाहतूक कोंडी निवारण, वाहतूक व्यवस्थापन, एकात्मिक रस्ता व वाहतूक नियोजन तसेच उद्योगांच्या प्रलंबित प्रशासकीय तक्रारींचे कालबध्द पध्दतीने निराकरण करण्यासाठी समित्या गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

चाकण परिसरातील रस्ते दुरुस्ती, वाहतूक कोंडी निवारण व वाहतूक व्यवस्थापनासाठी जिल्हाधिकारी, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली व पोलीस आयुक्त, पिंपरी-चिंचवड यांच्या सह अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात येत आहे.

**उच्च स्तरीय समितीची रचना :-**

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे पदनाम | धारण केलेले पद |
|---|---|---|
| १ | जिल्हाधिकारी, पुणे | अध्यक्ष |
| २ | पोलीस आयुक्त, पिंपरी-चिंचवड, पुणे | सह अध्यक्ष |
| ३ | मुख्य कार्यकारी अधिकारी, पुणे | सदस्य |
| ४ | मुख्य अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, पुणे | सदस्य |
| ५ | मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे | सदस्य |
| ६ | मुख्य अभियंता, महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ, पुणे | सदस्य |
| ७ | सह मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, पुणे | सदस्य |
| ८ | मुख्य अभियंता, पुणे महानगर क्षेत्र विकास प्राधिकरण यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ९ | आयुक्त, पुणे महानगरपालिका यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| १० | अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास प्राधिकरण, पुणे | सदस्य |
| ११ | अध्यक्ष/प्रतिनिधी, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड ॲग्रिकल्चर, पुणे | सदस्य |
| १२ | अध्यक्ष/प्रतिनिधी, चाकण औद्योगिक संघटना, पुणे | सदस्य |
| १३ | अध्यक्ष/प्रतिनिधी, संबंधित औद्योगिक संघटना | सदस्य |
| १४ | निवासी उपजिल्हाधिकारी, पुणे | सदस्य सचिव |

अध्यक्षांच्या परवानगीने संबंधित विभाग/प्राधिकरणांचे अधिकारी, तज्ज्ञ तसेच उद्योग संघटनांचे प्रतिनिधी यांना बैठकीस विशेष निमंत्रित म्हणून आमंत्रित करण्यात येईल.

२. समितीची कार्यकक्षा:-

i. संपूर्ण चाकण परिसरातील रस्ते विविध विभाग व प्राधिकरणांच्या अखत्यारीत असले तरी, प्रशासकीय मालकी व कार्यक्षेत्र अबाधित ठेवून, नियोजन, प्राधान्यक्रम निश्चिती, तांत्रिक समन्वय,

निधीचे अभिसरण व अंमलबजावणीच्या दृष्टीने संपूर्ण चाकण परिसरातील रस्त्यांना एकच एकात्मिक नियोजन घटक म्हणून विचारात घेणे.

ii. प्रमुख रस्ते, औद्योगिक क्षेत्राकडे जाणारे मार्ग, अंतर्गत व जोडरस्ते, सेवा रस्ते, प्रमुख चौक, पाणी निचरा व्यवस्था, पथदिवे, वाहतूक सिग्नल, पार्किंग, रस्ता सुरक्षा, जड वाहन वाहतूक व इतर पूरक पायाभूत सुविधांचा समावेश असलेला एकत्रित व सर्वसमावेशक रस्ता व वाहतूक आराखडा तयार करणे. सदर आराखड्यात तातडीची, अल्पकालीन, मध्यमकालीन व दीर्घकालीन कामे निश्चित करून संबंधित विभागांनी परस्पर समन्वयाने त्यांची अंमलबजावणी करणे.

iii. चाकण परिसरातील प्रमुख रस्ते, औद्योगिक क्षेत्राकडे जाणारे मार्ग, अंतर्गत रस्ते, जोडरस्ते व सेवा रस्त्यांची तातडीने पाहणी करून खड्डे व रस्त्यांची दुरवस्था दूर करण्यासाठी आवश्यक दुरुस्तीची कामे हाती घेणे.

iv. वाहतूक कोंडीची प्रमुख ठिकाणे निश्चित करुन जड वाहनांची वाहतूक, औद्योगिक वाहतूक, पार्किंग, चौक व्यवस्थापन, सेवा रस्ते, वाहतूक सिग्नल व पर्यायी मार्ग यांचा एकत्रित विचार करून तातडीच्या व दीर्घकालीन उपाययोजना निश्चित करणे.

v. वाहतूक नियमन, जड वाहनांच्या वाहतुकीचे व्यवस्थापन, पार्किंग व्यवस्था, चौक सुधारणा, रस्ता सुरक्षा व आवश्यक वाहतूक नियंत्रणाच्या उपाययोजनांबाबत संबंधित विभागांशी समन्वय साधून आवश्यक निर्णय घेणे.

vi. भविष्यातील औद्योगिक विस्तार व वाहतूक वाढीचा विचार करून रस्ते सुधारणा, रुंदीकरण, सेवा रस्ते, पाणी निचरा, सार्वजनिक वाहतूक, रस्ता सुरक्षा व वाहतूक व्यवस्थापन यांचा समावेश असलेला एकात्मिक आराखडा तयार करणे.

vii. रस्ते दुरुस्ती, वाहतूक कोंडी निवारण व एकात्मिक रस्ता आराखड्याच्या अंमलबजावणीचा नियमित आढावा घेणे.

२.१ समितीने तातडीने आवश्यक व प्राधान्याची म्हणून शिफारस केलेल्या रस्ते व वाहतूक विषयक कामांना संबंधित विभाग/प्राधिकरणांनी Fast-Track Basis वर प्राधान्याने प्रशासकीय, तांत्रिक व इतर आवश्यक मंजुरी देऊन अंमलबजावणी सुरु करावी. अनावश्यक प्रशासकीय विलंब टाळण्यासाठी संबंधित विभागांनी निश्चित कालमर्यादेत कार्यवाही करणे.

२.२ वरील सर्व बाबींवरील नियोजन, मंजुरी, समन्वय व प्रत्यक्ष अंमलबजावणीची कार्यवाही या शासन निर्णयाच्या दिनांकापासून १० महिन्यांच्या कालावधीत पूर्ण करण्यात यावी. संबंधित विभागांनी त्यांच्या अखत्यारीतील कामांसाठी स्वतंत्र कालबद्ध कृती आराखडा तयार करुन त्याची प्रगती नियमितपणे समितीसमोर सादर करावी.

३. चाकणसह पुणे जिल्ह्यात नवीन उद्योग व Global Capability Centres (GCCs) मोठ्या प्रमाणावर येत असल्याने विविध शासकीय विभागांकडून आवश्यक मंजुरी, परवानग्या व सेवा मिळविताना उद्भवणाऱ्या प्रलंबित बाबींचे जलद निराकरण करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे येथे खालीलप्रमाणे "उद्योग तक्रार निवारण कक्ष" (Industry Grievance Redressal Cell) स्थापन करण्यात येत आहे.

तक्रार निवारण कक्षाची रचना:-

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे पदनाम | धारण केलेले पद |
|---|---|---|
| १ | जिल्हाधिकारी, पुणे | अध्यक्ष |
| २ | पोलीस आयुक्त, पिंपरी-चिंचवड, पुणे | सह अध्यक्ष |
| ३ | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे | सदस्य |
| ४ | सह मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, पुणे | सदस्य |
| ५ | प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे | सदस्य |
| ६ | महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, पुणे | सदस्य |
| ७ | संबंधित अधिकारी, महावितरणमहापारेषण/, पुणे | सदस्य |
| ८ | प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, पुणे | सदस्य |
| ९ | प्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे | सदस्य |
| १० | उपसंचालक, नगररचना विभाग, पुणे | सदस्य |
| ११ | सहाय्यक संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य, पुणे | सदस्य |
| १२ | उपआयुक्त, कामगार विभाग, पुणे | सदस्य |
| १३ | अध्यक्ष/ प्रतिनिधी, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड ॲग्रिकल्चर, पुणे/ संबंधित औद्योगिक संघटना | सदस्य |
| १४ | निवासी उपजिल्हाधिकारी, पुणे | सदस्य सचिव |

अध्यक्षांच्या परवानगीने संबंधित विभाग/प्राधिकरणांचे अधिकारी, तज्ञ तसेच उद्योग संघटनांचे प्रतिनिधी यांना बैठकीस विशेष निमंत्रित म्हणून आमंत्रित करण्यात येईल.

४. तक्रारदार उद्योगाने संबंधित शासकीय विभाग/प्राधिकरणाकडे विहित पद्धतीने सादर केलेल्या, परंतु निर्धारित कालावधीत निराकरण न झालेल्या अथवा अनावश्यकरीत्या प्रलंबित राहिलेल्या तक्रारींचाच विचार तक्रार निवारण कक्षामार्फत करण्यात येईल. संबंधित विभागाकडे यापूर्वी सादर न

केलेल्या नवीन अथवा प्रथमच मांडण्यात येणाऱ्या तक्रारी थेट या कक्षाकडे स्वीकारल्या जाणार नाहीत. अशा तक्रारी संबंधित विभाग/प्राधिकरणाकडे प्रथम सादर करणे आवश्यक राहील. कक्षामार्फत प्राप्त तक्रारींची विभागनिहाय नोंद ठेवून संबंधित विभागास प्रकरणाच्या निराकरणासाठी आवश्यक निर्देश देण्यात येतील व त्याची प्रगती कालबद्ध पद्धतीने तपासण्यात येईल.

५. सर्व संबंधित विभाग, शासकीय यंत्रणा व प्राधिकरणांनी या शासन निर्णयातील तरतुदींनुसार आवश्यक कार्यवाही तातडीने सुरु करावी. या शासन निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक प्रशासकीय व वित्तीय कार्यवाही संबंधित विभागांनी त्यांच्या प्रचलित नियम, शासन निर्णय, आर्थिक अधिकार व उपलब्ध तरतुदींनुसार करावी.

६. प्रस्तुत शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेताक २०२६०८१४२१०६४६००१६ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

CHARUSHILA
DEVENDRA
CHAUDHARI

Digitally signed by CHARUSHILA DEVENDRA CHAUDHARI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PLANNING DEPARTMENT,
2.5.4.20=B99D7DCA0E63BE1BD1B7158B9523537DCC1D46BC807768647A9ED4FF3816ECF3, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=A75E4CF904B78F2AE051843EA1BA6106A393C2B0CF60FE03C945913B2BAE935F, cn=CHARUSHILA DEVENDRA CHAUDHARI
Date: 2026.08.14 21:07:41 +05'30'

**(चारुशीला चौधरी)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई,
२. मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
३. मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
४. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद / विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
५. मा. उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
६. मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
७. सर्व सन्माननीय सदस्य, विधानपरिषद / विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
८. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई,
९. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
१०. मा. उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
११. मा. उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
१२. सर्व मा. मंत्री महोदय यांचे खाजगी सचिव,
१३. मंत्रालयीन विभागाचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,

१४. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानपरिषद), विधानभवन, मुंबई,
१५. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानसभा), विधानभवन, मुंबई,
१६. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई,
१७. महासंचालक, माहिती जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई,
१८. विभागीय आयुक्त/ जिल्हाधिकारी, पुणे,
१९. महानगरपालिका आयुक्त, पुणे,
२०. आयुक्त, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे,
२१. पोलीस आयुक्त, पिंपरी-चिंचवड, पुणे,
२२. मुख्य कार्यकारी अधिकारी, पुणे,
२३. मुख्य अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, पुणे,
२४. अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास प्राधिकरण, पुणे,
२५. अध्यक्ष/प्रतिनिधी, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड ॲग्रिकल्चर, पुणे,
२६. अध्यक्ष/प्रतिनिधी, चाकण औद्योगिक संघटना, पुणे,
२७. सर्व सदस्य, उच्च स्तरीय समिती/ तक्रार निवारण समिती,
२८. निवडनस्ती, कार्यासन-१४१२, नियोजन विभाग.